# Pimpri Chinchwad Police Commissionerate



**प्रेसनोट** दिनांक - १६/०३/२०२०

ज्या अर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**तरी नागरिकांनी याबाबत आपल्या काही सूचना असल्यास त्या पोलीस उपआयुक्त,वाहतूक शाखा पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयात दि.१७/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० पर्यंत लेखी स्वरुपात कळवाव्यात. नागरिकांच्या सूचना व हरकती विचार करून** अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येईल.

दि.१६/१२/२०१९ रोजी आंबी गाव येथे पुल पडल्याने आंबी गावाकडे जाणारी वाहतुकीची कोंडी निर्माण होत आहे. सदरच्या भागात मोठयाप्रमाणात एमआयडीसी असल्याने एमआयाडीसीतील कंपनी करीता अवजड वाहतुक शिवाजी चौक तळेगाव कडुन कातवी मार्गे जा आहे.शिवाजी चौकातुन कातवीकडे जाणारा रस्ता हा साधारण ०३ मी. रुंदीचा असुन एकावेळी एकच वाहन सदर मार्गातुन जावु शकते व रस्त्यालगत मोठया प्रमाणावर रहिवाशी वस्त्या व इंद्रायणी हायस्कुल आहे. सदर ठिकाणी अवजड वाहतुकीमुळे अपघात होवुन जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी खालील नमुद रस्त्यावर सर्व अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

## देहूरोड वाहतुक विभाग अंतर्गत

१. चाकण कडुन सिंडीकेट चौक ,शिवाजी चौक मार्गे कातवी फाटा जाणारी अवजड वाहतुक (सहा टायर व त्यावरील वाहन) शिवाजी चौकातुन पुढे जाण्यास मनाई .

पर्यायी मार्ग :- चाकण –तळेगाव-वडगाव फाटा - वडगाव मार्गे एम आय डी सी हद्दीत जातील.

२. एम आय डी सी हद्दीतुन कातवीफाटा मार्गे शिवाजी चौक सिंडीकेट चौक येथे जाणारी अवजड वाहतुक (सहा टायर व त्यावरील वाहन) कातवी फाटा पासुन पुढे जाण्यास मनाई

पर्यायी मार्ग :- तळेगाव मार्गे इच्छीत स्थळी जातील.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. वरील प्रमाणे देहूरोड वाहतुक विभाग अंतर्गत जाणा-या सर्व **अवजड वाहनांना प्रवेश बंदी करणेबाबत अधिसुचना** (नोटीफिकेशन ) काढण्यात येत आहे.

सुधीर हिरेमठ भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.